कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १५/०९/२०१७

आज दिनांक १५/०९/२०१७ रोजी सकाळी ०८.१५ वा. च्या सुमारास सीआरपीएफ बटालियन ३७ चे पोलीस शिपाई अमितकुमार, वय- २९ वर्षे, यांनी स्वतः वर गोळी झाडून आत्महत्या केली.

उपमुख्यालय (प्राणहिता) अहेरी येथे केंद्रीय राखीव पोलीस दलाचे ३७ वे बटालियन मध्ये कार्यरत आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे ३७ बटालियन मध्ये कार्यरत असलेले अमितकुमार, हे ५ वर्षापासून हे उपमुख्यालय (प्राणहिता) अहेरी येथे कार्यरत होते. अमितकुमार, हे हरियाणा राज्यातील बाहू या मुळगावचे रहिवासी होते. अमितकुमार यांच्या आत्महत्येचे कारण अदयाप समजू शकले नाही.

सदर घटनेबाबत अहेरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक सुरेश मदने पोस्टे अहेरी करीत आहेत.